पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २७ डिसेंबर २०२५

# आंतरराष्ट्रीय रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेशचे यश



कोल्हापूर : सोलापूर येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग रायसोनी चषक बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ८ गुण मिळवून संयुक्त दुसरा क्रमांक पटकाविला. यामुळे त्याला १५ हजार रुपये व चषक बक्षीस आणि फिडे रॅपिड रेटिंगमध्ये ४७ गुणांनी वाढ झाली. स्पर्धेत आय. एम. संजीत पाल (पश्चिम बंगाल) हा साडेआठ गुणांसह विजेता ठरला. त्याला ३१ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. दोन लाख रुपयांच्या बक्षिसांच्या स्पर्धेत देशातील १ आय. एम., ९४ फिडे मानांकितांसह २९२ खेळाडू सहभागी झाले होते. ऋषिकेश अनुज अॅकॅडमीत सराव करत असून स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

निःपक्ष आणि निर्भिड दैनिक
गगनतारा

# विवेकानंद कॉलेज येथे १२ वी इंग्लिश विषयावर प्रा. बुराण यांचे मार्गदर्शन

**गगनतारा वृत्तसेवा**

**पडळ/प्रतिनिधी, ता. २६ :** इंग्रजी विषयाचा अभ्यास योग्य पद्धतीने, सातत्याने व तज्ज्ञ मार्गदर्शनाच्या साहाय्याने केल्यास विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेत निश्चितच भरघोस यश मिळवता येते, असे प्रतिपादन प्राध्यापक नंदकुमार बुरान यांनी केले.

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित बारावी स्कॉलर बॅचच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी, परीक्षेची भीती दूर व्हावी आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्राध्यापक बुरान यांनी यावेळी बारावी इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे संपूर्ण स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रश्नपत्रिका सोडवताना वेळेचे योग्य नियोजन कसे करावे, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, तसेच उत्तरपत्रिका नीटस, शुद्ध व मुद्देसूद कशी लिहावी यावर त्यांनी विशेष भर दिला.

तसेच, प्रश्नांची अचूक मांडणी, सारांश लेखनाचे तंत्र, माइंड मॅपिंगचा प्रभावी वापर, कवितेचे रसग्रहण कसे करावे, तसेच लेखन कौशल्य कसे विकसित करावे याबाबत त्यांनी उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय बारावीच्या अभ्यासक्रमातील कादंबरीच्या आधी भागाचे सखोल व मुद्देसूद विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबाबतची भीती दूर होऊन अभ्यासाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा निश्चितच परीक्षेत फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. सुनील जगताप, साळुंखे सर, नवले सर, सौ. पाटील मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने करण्यात आले.



12/25
[illegible]
27-12-2025